संदर्भ:- १.शासन निर्णय ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दि. १५ मे २०१४.
२.महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक जिपब-४१४/प्र.क.-११२/आस्था-१४ मंत्रालय, मुंबई दिनांक ०२ जूलै २०१४.
३.महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक जिपब/४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४ मंत्रालय, मुंबई दि. ०२ जाने.२०१७.
४.महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन पुरक पत्र क्रमांक जिपब४८१७/प्रक्र१२८/आस्था-१४ मंत्रालय, मुंबई दिनांक०७ मार्च २०१९.
५.महाराष्ट शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०२१/प्र.क्र-२०/कार्या-१२दिनांक ९ जुलै २०२१.
६.उप सचिव ग्राम विकास विभाग, म.शा. यांचे पत्र क्र संकीर्ण २०२१/प्रक्र ५८९/आस्था –१४ दि. १४.०७.२०२१
७.या कार्यालयाचे दिनांक ३१.०५.२०२१ रोजीचे अंतिम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी दिनांक २५.०७.२०२१
८.दिनांक ३०.०७.२०२१ रोजी झालेले समुपदेशन.

जा.क्र./जिपनां/शिअ/ प्रा-१९/ 3523/२०२१
कार्यालय, नांदेड जिल्हा परिषद,नांदेड
दिनांक:- ३०/०७/२०२१.

## आदेश

ज्याअर्थी उपरोक्त संदर्भ क्र.(०१) व (०६) अन्वये शासन निर्णयात नमूद केलेल्या तरतूदीनुसार नांदेड जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्रा.) अंतर्गत **विस्तार अधिकारी शिक्षण** या संवर्गातील कर्मचाऱ्यांची वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संदर्भ क्र.(०७) नुसार प्रसिध्द करुन त्यातील बदली पात्र कर्मचाऱ्यांचे समुपदेशन दिनांक ३०.०७.२०२१ रोजी घेण्यात आले. सदर समुपदेशनात त्यांच्याकडून विकल्प घेवून त्यांच्या मागणी प्रमाणे रिक्त पदावर पदस्थापना देणे बाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नांदेड संदर्भ क्रमांक(०१) च्या शासन निर्णयानुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन खालील परिशिष्टात नमूद **विस्तार अधिकारी शिक्षण** यांची त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी **प्रशासकीय / विनंती** कारणावरुन बदली करीत आहे.

## परिशिष्ट

| अ.क्र. | विस्तार अधिकारी शिक्षण यांचे नाव | कार्यरत ठिकाण | बदलीचा प्रकार | बदलीने पदस्थापना दिलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४ | ५ |
| 1 | कैलाश मधुकर होणधरणे | पेठवडज / ता. कंधार | विनंती | हिप्परगा / ता. मुखेड |

### ::अटी व शर्ती ::

१. वरील परिशिष्टात नमूद कर्मचा-याची बदली प्रशासकीय कारणावरुन करण्यात आली असेल तर त्यांना बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील.
२. संबंधित कर्मचाऱ्यास बदलीच्या ठिकाणी रूजू होणेसाठी दि.30.07.2021 रोजी मध्यान्होनंतर या आदेशाव्दारे कार्यमुक्त करण्यात येत आहे. मात्र संबंधित कर्मचा-यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार आवश्यकतेनुसार इतर कर्मचाऱ्यांकडे सोपविण्याबाबतची कार्यवाही संबंधित कार्यालय प्रमुख यांनी करावी.
३. कार्यालय प्रमुख यांना देवून सुचित करण्यात येते की, बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते दिनांक 31.07.2021 पर्यंतचे मूळ पदस्थापनेच्या ठिकाणाहून अदा करण्यात यावेत व दिनांक 01.08.2021 पासूनचे वेतन व भत्ते बदली ने पदस्थापना दिलेल्या कार्यालयातून काढण्यात यावेत. अशा कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते दिनांक 31.07.2021 नंतरचे बदली होण्याच्या पुर्वीच्या मूळ कार्यालयातून काढल्यास त्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील याची नोंद घ्यावी.
४. बदली कर्मचाऱ्याचा संपूर्ण पदभार स्थानिक व्यवस्था करुन अन्य कर्मचाऱ्याकडे सुपूर्द करुन पदभार यादीसह संबंधित कार्यालयास सादर करावा.
५. सदर आदेशाचे पालन जे कर्मचारी करणार नाहीत त्यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-**
**( वर्षा ठाकुर - घुगे भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद नांदेड करिता

**प्रतिलीपी,**

1.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना माहितीस्तव.
2.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद नांदेड यांना माहितीस्तव
3.गट विकास अधिकारी, पंचायत समिती संबंधित यांना कार्यवाहीस्तव व अनुपालनास्तव
4.गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती संबंधित यांना कार्यवाहीस्तव व अनुपालनास्तव.
5.संबंधितास अनुपालनास्तव.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नांदेड करिता

**स्थळ प्रत मा. मु.का.अ. यांची स्वाक्षरी असे.**